सार्वजनिक बांधकाम प्रकल्प विभाग
जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव
दि.२१/१२/२००६.

<u>*जाहीर निविदा सूचना*</u>

*(बांधा,वापरा व हस्तांतर करा या तत्वावर )*

तमाम मक्तेदार यांना कळविण्यात येते की, जळगाव महानगरपालिका हद्दीत बांधा,वापरा व हस्तांतर करा या तत्वावर ठिकठिकाणी अत्याधुनिक बस थांबा व दिशा दर्शक कमानी उभारणी करणे कामी सिलबंद पाकिटातून भाव मागविण्यात येत आहे. तरी ज्या मक्तेदारास सदरचे काम करण्याची ईच्छा असेल अशांनी खाली नमूद केलेली इसारा अनामत म.न.पा.खजिन्यात रोखीने भरुन तसा पावती क्रं.व कामाचे नाव निविदा पाकीटावर नमूद करून मुदतीच्या आत ९ वा मजला ब विंग मध्ये म.शहर अभियंता/प्रकल्प अभियंता यांचे कार्यालयात पेटीत सिलबंद पाकीटे टाकावी.

| | | |
|---|---|---|
| १) | इसारा अनामत स्विकारण्याची तारीख व वेळ :- | रू. १०००/- दि.२७ /१२/०६ दुपारी १६.०० वाजेपर्यंत |
| २) | सीलबंद निविदा स्विकारणे :- | दि .०२/०१/०७ दुपारी १६.०० वाजेपर्यंत |
| ३) | सीलबंद निविदा उघडणे :- | शक्य झाल्यास त्याच दिवशी म्हणजेस दि.०२/०१/२००६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत |

टिप :-

१) सपर्कांचा पत्ता जळगाव शहर महानगरपालिका,कार्यालय १७ मजली प्रशासकीय इमारत महात्मा गांधी रोड नेहरु चौक ,जळगाव असा आहे.

२) विस्तारकास स्वखर्चाने अत्याधुनिक बस स्टॉप व दिशा दर्शक कमानी यांचे बांधकाम करावयाचे आहे.तसेच सदरची ऑफर देतांना विस्तारक यांनी नकाशे,डिझाईन व आर्थिक विस्तारक योजना तयार करून सादर करावयाची आहे.

३) सदर कामाची निविदा २५ वर्षाचे कालावधीसाठी मागविण्यात येत आहे. २५ वर्षाच्या मुदतीनंतर बस स्टॉप व कमानी यांची मालकी महानगरपालिकेची राहील.

४) बस स्टॉप व कमानीवर महानगरपालिकेतर्फे कुठल्याही प्रकारचे कर आकारण्यात येणार नाही. मात्र २५ वर्षाच्या कालावधी दरम्यान सदर बस स्टॉप व कमानींची देखभाल दुरुस्ती विस्तारकास स्वखर्चाने करावी लागेल.

५) या सर्व बाबी सह विस्तारकाने स्वत:चे संकल्पन सिलबंद पाकिटातुन मनपा कार्यालयात वरील मुदतीत जमा करावे.

६) जळगाव शहर मनपाने कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे,किंवा हे काम रद्द करणे, थांबविणे इ. हक्क राखुन ठेवलेले आहेत.

७) अंतिमत: एखाद्या विस्तारकाची निविदा स्विकारल्यानंतर विस्तारकाने निविदे सोबत सादर केलेले नकाशे, डिझाईन व अंदाजपत्रके सक्षम प्राधिकरणाकडून मंजूरी घेतल्यानंतरच त्याला प्रत्यक्ष काम करण्याचा आदेश देण्यात येईल.

८) या कामी स्विकृत निविदा मक्तेदारास खालील बाबींची मंजूरी प्राप्त क रुन घेणे आवश्यक राहील.

अ) जळगाव महानगरपालिका,हद्दीतील बस थांब्या करीता व कमानी करीता आवश्यक जागा ठरविण्याचे अधिकार सभापती स्थायी समिती,महानगरपालिका जळगाव यांचे असून त्यानुसार ठरवून दिलेल्या जागांचा शहर वाहतुक नियंत्रण विभागाकडून ना हरकत दाखला प्राप्त करुन मनपास सादर करणे आवश्यक राहील.

ब) वरील प्रमाणे ठरविलेल्या जागांवर बांधावयाच्या बस थांब्याचे व दिशादर्शक कमानींचे नकाशांना नगररचना विभागाकडून नकाशांना मंजूरी घेणे आवश्यक राहील. नकाशांच्या ५ मंजूर प्रती मनपा प्रकल्प विभागात जमा कराव्या.

क) नकाशानुसार अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकरणाकडून तांत्रिक मंजूरी,आर.सी.सी.डिझाईन मंजूरी घेणे आवश्यक राहील व त्याच्या ५ प्रती प्रकल्प विभागात जमा करावे.

ड) या शिवाय इतर आवश्यक त्या सर्व मंजूरी सक्षम प्राधिकरणाकडुन विस्तारकाने प्रथम प्राप्त करून घेणे व मनपास सादर करणे आवश्यक आहे.त्यासाठी आवश्यक तो खर्च विस्तारकास करावा लागेल.

वरील प्रमाणे सक्षम मंजूरी विस्तारकाने सादर केल्यानंतर त्याला प्रत्यक्ष कामाचा आदेश देण्यात येईल.

९) काही कारणास्तव निविदा प्रक्रीयेत बदल अथवा फरक करावा लागल्यास तो मनपा करेल हा अधिकार मनपाने राखून ठेवलेला आहे.

१०) विस्तारकाने त्याचा सर्व कामांचे कालबध्द नियोजन आराखडा हा प्रथम निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्व कामांचे कालबध्द नियोजना नुसार (बारचार्ट नुसार) काम करावे लागेल.

११) विस्तारकाला त्यांच्या ऑफर बाबत विस्तृत विश्लेषण करून तांत्रिकबाबी बाबत व आर्थिक बाबींबाबत आखणी करून देणे आवश्यक आहे.

१२) कामाच्या कालावधीत व त्यानंतर सुद्धा कालावधीत (२५ वर्ष) मक्तेदाराला त्याचा कामाबाबत सर्व जबाबदारी निश्चीत असेल.

१३) विस्तारकाने या कामाची ऑफर मंजूर झालेवर १००/- रु च्या मुंद्राक शुल्क मनपा विहीत नमून्यात करारनामा करून द्यावा लागेल.

१४) विस्तारकाचे कार्यालयाचा मनपा जळगाव हद्दीतील स्थानिक अधिकृत पत्ता निविदेत नमूद करणे आवश्यक आहे.

१५) विस्तारकाने यापूर्वी हाती घेतलेली कामे व पूर्ण केलेली कामे यांची छायाचित्रे व इतर माहिती, तसेच यापूर्वी विविध संस्थेशी केलेला पत्र व्यवहार ऑफर प्रभावित करणेच्या दृष्टीने जोडणे आवश्यक आहे. त्याचा विचार निविदा अंतीम करतांना केला जाईल.

१६) ऑफरची वेधता मुदत दाखल तारखेपासून कमीत कमी ३ महिने राहील.

(सुरेश एम. लोखंडे)
आयुक्त,
जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव

ठिकाण :- जळगाव
दिनांक :- २१/१२/२००६.